# सातारा जिल्हा परिषद,सातारा
## सामान्य प्रशासन विभाग

कार्यालय दुरध्वनी :- (०२१६२)२३८१२६ फॅक्स नं.२३०६०१ E-mail -: dyceogadstr@gmail.com

**कालमर्यादा**

जा.क्र.साप्रवि/आस्था-२(५)/कावि-१०६/२०१६
दिनांक -:०५: ०५ : २०१६

**प्रति,**

**संबंधित खाते प्रमुख ----------------------------------**
**जिल्हा परिषद सातारा**
**गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती ---------------------**

विषय -: सामान्य प्रशासन विभागाकडील संवर्ग- सर्वसाधारण बदल्या सन २०१६
संदर्भ -:१.महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडील शासन निर्णय क्रमांकःजिपब-४१४/प्र.क्र.११२/आस्था-१४ दिनांक १५/५/२०१४ व शासन पत्र २२/४/२०१६.
२. या कार्यालयाचे पत्र क्र.साप्रवि/आस्था-२(५)/कावि-१००/२०१६, दिनांक २५/४/२०१६.

अवर सचिव, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जल संधारण विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र. जिपब ४८१६/(प्र.क्र.१३८/१६)/आस्था १४, दिनांक २२ एप्रिल २०१६ अन्वये, जिल्हा परिषदेच्या गट क व गट ड कर्मचा-यांच्या जिल्हांतर्गत बदली २०१६ बाबत, ग्राम विकास व जल संधारण विभाग मुंबई यांचे पत्र क्र. जिपब-०५१४ /प्र.क्र.११८/आस्था-१४, दिनांक १५ मे २०१४ नुसार, विहित केलेल्या सुधारीत धोरणानुसार व त्यामध्ये विहीत केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे सर्वसाधारण बदल्यांची कार्यवाही पूर्ण करणेबाबत कळविले आहे.

आपल्यास्तरावरुन प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे, दिनांक १५ मे २०१४ रोजीच्या शासन निर्णयातील सुधारीत तरतुदीनुसार, सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, विस्तार अधिकारी (सांख्यिकी) वरिष्ठ सहाय्यक व कनिष्ठ सहाय्यक या संवर्गातील कर्मचारी यांची अनुक्रमे प्रशासकीय, विनंती व आपसी बदलीसाठी बदलीपात्र कर्मचारी यांची यादी तयार केली असून, सदर संवर्गातील बदलीपात्र कर्मचारी यांची तात्पुरती वास्तव्य सेवा जेष्ठता यादी, या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, आपले कार्यालयास पाठविणेत आली आहे. **तसेच सदरची यादी सातारा जिल्हा परिषदेच्या www.zpsatara.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली आहे.** या संवर्गाच्या वास्तव्य सेवा जेष्ठता यादी संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून, वास्तव्य सेवा जेष्ठता यादी संबंधित कर्मचारी यांचे निदर्शनास आणल्याबाबत सर्व संबंधिताच्या स्वाक्षरी घेण्यात यावी असे संदर्भीय अ.क्र. २ च्या पत्रान्वये कळविण्यात आले असून, सदर यादीबाबत कर्मचारी यांच्या काही हरकती/सुचना/आक्षेप आणि तक्रारी असल्यास त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह दिनांक ३०/०४/२०१६ पर्यत आस्थापना लिपीकाने समक्ष या कार्यालयास सादर करणेबाबत सदर पत्रान्वये आपणांस कळविले आहे.

आपले कार्यालयाकडून वरील विहित मुदतीत आलेल्या हरकती/आक्षेप यांचा विचार करुन, वरील संवर्गातील कर्मचारी यांच्या अंतिम वास्तव्य सेवा जेष्ठता यादी यासोबत पाठविण्यात येत आहे. तसेच सदरची यादी सातारा जिल्हा परिषदेच्या या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तरी सदरची अंतिम वास्तव्य सेवा जेष्ठता यादी संबंधित कर्मचारी यांचे निदर्शणास आणावी. तसेच जिल्हास्तरावरुन करण्यात येणा-या बदल्यांची तारीख अलाहिदा आपणांस कळविण्यात येईल. तदनंतर या बदलीपात्र कर्मचारी यांना उपस्थित राहणेबाबत कळविण्यात यावे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सातारा**

**प्रत :- सातारा जिल्हा परिषद, नोटीस बोर्ड प्रसिध्दीकरीता..**